शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास उपकंपनीची (Subsidiary) स्थापना करण्याबाबत.......

---------------------------------------

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक:- कुविम २००६/प्र.क्र.२८९/विघयो-२,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०००३२.
दिनांक :- २६ मार्च, २०१०.

**वाचा** :- १) शासन निर्णय सामाजिक न्याय सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक विमा व प्र.क्र. ३९५ २ दिनांक २५ सप्टेंबर १९९८.
२) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक २००६ दिनांक २५, ऑगस्ट २००९.

**प्रस्तावना:** कोकण विभागातील मागास असलेल्या कुणबी व इतर मागासवर्गीयांची आर्थिक उन्नती व्हावी यासाठी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ अंतर्गत कोकण विभागातील कुणबी व इतर मागासवर्गीयांसाठी “शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळाची” स्थापना शासन निर्णय दिनांक २५.०२.२००८ करण्यात आलेली आहे. पेजे महामंडळाच्या संचालक मंडळाची नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**:- शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ (महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाची उपकंपनी) बाबत खालील बाबी शासन मंजुरी देत आहे :-

अ) महामंडळाच्या संचालक मंडळावर अध्यक्षांसह तीन अशासकीय सदस्य व खालील पाच शासकीय सदस्य असतील :-

| | | |
|---|---|---|
| १. शासन नियुक्त पदाधिकारी | - | अध्यक्ष |
| २. उपसचिव, सामाजिक न्याय | - | संचालक |
| ३. संचालक, विजाभज इमाव व विमाप्र महाराष्ट्र राज्य पुणे. | - | संचालक |
| ४. निबंधक, सहकारी संस्था प्रतिनिधी | - | संचालक |
| ५. व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय मागासवर्ग वित्तीय व विकास महामंडळ, नवी दिल्ली. | - | संचालक |
| ६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ, मर्यादित, मुंबई. | - | व्यवस्थापकीय संचालक |
| ७. अशासकीय सदस्य (दोन) | - | संचालक |

२ शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ या उपकंपनी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास

महामंडळ (मर्या), मुंबई हे त्यांच्या स्वतःच्या पदाचा कार्यभार सांभाळून पेजे महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक पदाचा कार्यभार सांभाळतील.

३ महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाच्या योजना पेजे महामंडळासाठी लागू करण्यात याव्यात.

४ सदर महामंडळ नोंदणीकृत करण्यासाठी व त्या अनुषंगाने होणारा किमान खर्च महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाच्या निधीतून करण्यात यावा. सदर महामंडळ नोंदणीकृत झाल्यानंतर झालेला खर्च महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळास परत करण्यात यावा.

५ सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१००३२५१३१२२८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने .

-स्वाक्षरित /-

(जगदेव राठोड)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति :-

संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागास वर्ग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विभागीय समाज कल्याण अधिकारी, मुंबई विभाग, नवी मुंबई. (दोन प्रती)
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळ (मर्या.) मुंबई.
जिल्हा व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळ, मुंबई शहर /मुंबई उपनगर/ ठाणे /रायगड /रत्नागिरी /सिंधुदुर्ग.
महालेखापाल लेखा व अनुज्ञयेता लेखापरीक्षा महाराष्ट्र १ / २ मुंबई/ नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई, ठाणे.
निवासी, लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
अप्पर कोषागार अधिकारी, कोकण भवन, नवी मुंबई.
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, पाचवा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई ३२.
अवर सचिव, (अर्थसंकल्प) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
कक्ष अधिकारी, (नियोजन), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई ३२.
निवड नस्ती का- विघयो- २.